मुफद १९८१४१० e- Extn. maternity Leaves for Ladies staff members (File. 6.3.1.e)

क्र.आस्था.२(४)/ १२१ /२०१०

परिपत्रक :–

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र.प्ररजा–२०१०/(८६/१०)– विशि–१, दि.६ मार्च, २०१० मधील अटी/तरतूदींच्या अनुषंगाने विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर महिला कर्मचा–यांना अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसुती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ४ जून, २०१० रोजीच्या (बाब क्र.२१) बैठकीपुढे ठेवला असता, व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला :–

> असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील व महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील महिला कर्मचा–यांना अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसुती रजा १८० दिवसापर्यंत वाढविण्याबाबत महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्र.प्ररजा–२०१०/(८६/१०)– विशि–१, दिनांक ६ मार्च, २०१० ची नोंद घेण्यात यावी."

विद्यापीठातील महिला कर्मचा–यांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसापर्यंत वाढविणेबाबत वित्त विभागाच्या क्र.अरजा १४०९/प्र.क्र.८/०९/सेवा–६, दि.२४.८.२००९ मधील शासन निर्णयातील सर्व तरतूदी शिक्षक/शिक्षकेतर महिला कर्मचा–यांना जशाच्या तशा लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने कळविलेले असून, सदर अटी/तरतुदी खाली माहितीसाठी उध्दृत करण्यात आल्या आहेत :–

१. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ७४ मधील तरतुदीनुसार राज्य शासकीय महिला कर्मचा–यांना अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसापर्यंत वाढविण्यात यावी. या सुविधेचा लाभ फक्त दोन अपत्यांपुरताच मर्यादित राहील. प्रसूती रजा मंजूर करण्याच्या इतर शर्ती यापूर्वीप्रमाणे यापुढेही लागू राहतील.

२. या सुविधेचा लाभ आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२४.०८.२००९ पासून लागू राहील.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील यासंबंधातील विद्यमान तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदीपुरते सुधारण्यात आले असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रीतसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, प्रभारी नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांना कळविण्यात येते की सदरचे परिपत्रक सर्व संबंधित महिला अधिकारी/कर्मचा–यांच्या निदर्शनास आणावे.

२२।६।१०

स्थानापन्न कुलसचिव

मुंबई–४०००३२.
१६ जून, २०१०.

प्रति,
विद्यापीठातील विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,

## मुंबई विद्यापीठ

आस्थापना-२[४]

क्र. आस्थापना-२[४]/ ३१२ /१९९६.

२४ ऑक्टोबर, १९९६.

परिपत्रक

विषय :- कुलगुरु - मुंबई विद्यापीठ यांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४[८] नुसार निर्गमित केलेला निदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व सेवायोजन विभागाने मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९७४ कलम ७७ ए अन्वये मुंबई विद्यापीठाच्या शिक्षकेतर कर्मचारी [अधिकारी वर्गासुध्दा] यांच्यासाठी तसेच विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये आणि राज्य शासन व स्थानिक प्राधिकरणांच्या मार्फत चालविण्यात येणा-या संस्था सोडून इतर मान्यताप्राप्त संस्थातील शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी प्रमाणसंहिता नियमावली, सेवा विषयक शर्ती व अटी निश्चित केल्या आहेत.

आणि

ज्याअर्थी वरील प्रमाणसंहिता नियमावली १ मे, १९८४ या दिवसापासून अंमलात आलेली आहे.

आणि

ज्याअर्थी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ हा २२ जुलै, १९९४ या दिवसापासून अंमलात आलेला आहे.

आणि

ज्याअर्थी वरील प्रमाणसंहिता नियमावलीमध्ये महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये [शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा विषयक शर्ती व अटी] नियम १९८४ मधील नियम क्रमांक ३४ मध्ये विहित केलेल्या शर्तींच्या अधीन राहून स्थायी महिला कर्मचा-यास प्रसूती रजा मंजूर करण्यात येते.

आणि

ज्याअर्थी शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. १८९५/[३१८१]/विशि ४ दिनांक १५ मे, १९९६ अन्वये राज्य शासनाने केंद्र शासनाच्या

२/....

धोरणानुसार महिला शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत प्रसूती रजेच्या विद्यमान
तरतूदीमध्ये सुधारणा करण्याचे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक :
आरजा १७९०/१२/सेवा ९, दिनांक २८.७.१९९५ अन्वये निर्गमित केलेले आहेत.
त्याचप्रमाणे राज्य शासकीय कर्मचा-यांना वेळोवेळी शासनाकडून निर्गमित होणा-या
आदेशानुसार मिळणा-या सोयी - सवलती अकृषि विद्यापीठे व संलग्नित
महाविद्यालयातील कर्मचा-यांना जशाच्या तशा देण्याचा शासनाचा निर्णय आहे.

वरील आदेशान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील महिला कर्मचा-यांना प्रसूती रजा मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :

आणि

ज्याअर्थी दिनांक २८ जून, १९९६ [बाब क्र.२७] रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत वरील शासन निर्णयासंबंधी विचार होऊन असा ठराव करण्यात आला की, अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील महिला कर्मचा-यांना देय असणा-या विद्यमान प्रसूती रजेमध्ये सुधारणा आणि मूल दत्तक घेणा-या महिला कर्मचा-यांना देय व अनुज्ञेय रजा मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवा योजन विभाग यांनी क्रमांक युएसजी १८९५/[३१८.१]/विशि-४ दिनांक १५ मे, १९९६ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय स्वीकारण्यात यावा.

पुढे असा ठराव करण्यात आला की, वरील शासन निर्णय विद्यापीठातील तसेच संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील महिला कर्मचा-यांना १५ मे, १९९६ पासून लागू करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम १४[८] अन्वये दिलेल्या अधिकारात निदेश काढण्यासाठी कुलगुरूंना विनंती करण्यात यावी.

आणि

म्हणून मी, डॉ.[श्रीमती] स्नेहलता शा. देशमुख, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम १४[८] नुसार असलेल्या अधिकाराचा वापर करून निदेश देते की, शासन निर्णय क्र. युएसजी १८९५/[३१८१]/विशि-४ दिनांक १५ मे, १९९६ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील महिला कर्मचा-यांना देय असणा-या विद्यमान प्रसूती रजेमध्ये सुधारणा आणि मूल दत्तक घेणा-या महिला कर्मचा-यांना देय व अनुज्ञेय रजा खालीलप्रमाणे लागू करण्यात येत आहे :

अ] प्रसूती रजेचा अर्ज केल्याच्या दोन किंवा दोन पेक्षा कमी हयात मुले असलेल्या कायम सेवेतील कायम सेवेत नसलेल्या व कमीत कमी १ वर्ष सतत सेवेत असलेल्या त्याचप्रमाणे ३३ महिन्याची सतत सेवा केलेल्या कार्यव्ययी आस्थापनेवरील किंवा उकत्या दराने अथवा रोजंदारीवर परिश्रमित

... सेवा-या महिला कर्मचा-यांना सक्षम अधिकारी रजा सुरु झाल्याच्या पासून ९० दिवसांच्या कालावधीइतकी प्रसूती रजा मंजूर करु शकेल.

ख] महिला कर्मचा-याने मागणी केल्यास प्रसूती रजेला जोडून वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता कमाल [illegible] च्या कालावधीपर्यंत [६० दिवसांपर्यंत परिवर्तित व अनर्जित रजा धरुन] देय व अनुज्ञेय रजा घेण्यास परवानगी देता येईल.

क] गर्भपात, गर्भस्त्राव/आणि गर्भसमापन अधिनियम १९७१ अन्वये घडवून आणलेला गर्भपात यांच्याबाबतीत महिला कर्मचा-याला तिच्या संपूर्ण सेवेच्या कालावधीमध्ये [किती मुले हयात आहेत हे विचारात न घेता] कमाल ४५ दिवस इतकी प्रसूती रजा अनुज्ञेय राहील.

ड] गर्भपात इ. कारणास्तव महिला कर्मचा-यास विश्रांतीसाठी जास्त कालावधीची आवश्यकता असेल तर देय व अनुज्ञेय रजा मंजूर करुन अनुपस्थितीचा कालावधी नियमित करता येईल.

ङ] हे आदेश अंमलात आल्यानंतर गर्भपात इ. कारणास्तव प्रसूती रजा मंजूर करताना पूर्वी उपभोगण्यात आलेली अशा प्रकारची रजा विचारात घेऊ नये.

प्रसूती

महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये [शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा विषय शर्ती व अटी] नियम १९८४ मधील नियम ३४ च्या इतर तरतुदी पूर्वीप्रमाणेच राहतील.

शासकीय महिला कर्मचा-यांच्या बाबतीत मूल दत्तक घेतलेल्या महिला कर्मचा-यास एक वर्षापर्यंत किंवा मुलाचे एक वर्ष पूर्ण होईल तो दिनांक, यापैकी जो अगोदरचा दिनांक असेल त्या दिनांकापर्यंत देय व अनुज्ञेय रजा [वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता ६० दिवसांपर्यंत परिवर्तित रजा व अनर्जित रजा धरुन] घेण्यास परवानगी देणे व मुल दत्तक घेतानांच्या दिनांकाला जर मूल नसेल वा एकच मूल हयात असेल त्यांनाही ही सवलत देण्याचे आदेश दिनांक २८.७.१९९५ च्या आदेशान्वये लागू केले आहेत. हे आदेश कोणत्या तसेच अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील महिला कर्मचा-यांना या आदेशान्वये लागू करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवाविषयक [शर्ती व अटी] नियम १९८४ मधील, यासंबंधातील विद्यमान तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदीपुरत्या सुधारण्यात याव्यात असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

हे आदेश विद्यापीठातील तसेच संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील महिला कर्मचा-यांना १५ मे, १९९६ पासून अंमलात येतील आणि यासंदर्भात आवश्यक ते

...रनियम तयार करेपर्यंत ते चालू राहतील.

(स्नेहलता देशमुख)

[ डॉ. (श्रीमती) स्नेहलता आ. देशमुख ]
कुलगुरु

मुंबई ४०० ०३२.
ऑक्टोबर, १९९६.

---

क्र. आस्थापना–२[४]/४१२–अ/१९९६.
२४ ऑक्टोबर, १९९६.

प्रत माहितीसाठी अग्रेषित :

१] संचालक/प्रमुख, विद्यापीठ विभाग, प्राचार्य सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्राचार्य, घटक महाविद्यालये आणि प्रमुख, घटक मान्यताप्राप्त संस्था,
२] वसतिगृह अधिक्षक, विद्यापीठ वसतिगृहे,
३] संचालक, पश्चिम क्षेत्रीय उपकरण विज्ञान केंद्र,
४] संचालक, दूर शिक्षण संस्था,
५] संचालक, विद्याविषयक अधिकारी महाविद्यालय,
६] संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार विभाग,
७] संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
८] संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,
९] संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ,
१०] संचालक, गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था,
११] ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रंथालय,
१२] प्राध्यापक, गुरुदेव टागोर तौलनिक साहित्य अध्यासन,
१३] पीठासीन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व एस. एन्. डी. टी. महिला विद्यापीठ महाविद्यालय लवाद न्यायाधिकरण,
१४] मानद विधि सल्लागार, मुंबई विद्यापीठ,
१५] समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना,
१६] वित्त व लेखा अधिकारी,
१७] नियंत्रक, परीक्षा विभाग,
१८] नियंत्रक, मुद्रण व लेखनसामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय,
१९] उपकुलसचिव [वित्त व लेखा], मुख्य लेखापाल व सर्व सहायक कुलसचिव [वित्त व लेखा],
२०] विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव व सर्व सहायक कुलसचिव,
२१] सहायक कुलसचिव, विद्यापीठ प्रशासकीय उपकेंद्र, रत्नागिरी,
२२] कुलसचिवांच्या कार्यालयातील विविध विभागांचे प्रमुख,
२३] विद्यापीठ अभियंते [फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर],
२४] सुरक्षा अधिकारी व सर्व सहायक सुरक्षा अधिकारी,
२५] उप-प्रादेशिक सेवायोजन अधिकारी, विद्यापीठ सेवायोजन आणि मार्गदर्शन केंद्र,
२६] उद्यान अधिक्षक,

२७] अभिलेखा [ Record ] विभाग - १० प्रती,
२८] स्वीय सहायक : १] कुलगुरु २] प्र-कुलगुरु व ३] कुलसचिव

डॉ. श्री देशमुख

[ डॉ. [श्रीमती] स्नेहलता शा. देशमुख ]
कुलगुरु.

अकपं/२००११८

# University of Mumbai

**Extended Maternity Leaves for ladies staff Members ( File Name: 6.3.1.e)**

| Sr. No | Name of Employees | Maternity of Leave (180 days) | Extension of Leave |
|---|---|---|---|
| 1 | Smt. Nilambari H. Sawant | 29.12.2015 to 25.06.2016 | - |
| 2 | Smt. Pallavi P. Sonawane | 24.10.2015 to 20.04.2016 | |
| 3 | Smt. Bharati Y. Shirsath | 15.02.2016 to 12.08.2016 | - |
| 4 | Smt. Sangita P. Suryawanshi | 02.05.2017 to 28.10.2017 | 29.10.2017 to 29.11.2017 |
| 5 | Smt. Sanjivani D. Karekar | 05.04.2017 to 01.10.2017 | 02.10.2017 to 30.11.2017 (HPL) |
| 6 | Smt. Jyoti Y. Dighe | 18.01.2016 to 15.07.2016 | |
| 7 | Smt. Bhavana G. Thakur | 04.07.2017 to 30.12.2017 | 31.12.2017 (HPL) |
| 8 | Smt. Komal S. Mankar | 26.12.2016 to 23.06.2017 | |
| 9 | Smt. Shruti S. Manjrekar | 08.11.2016 to 06.05.2017 | - |
| 10 | Smt. Jyoti P. Waghela | 01.12.2016 to 29.05.2017 | 30.12.2017 to 31.08.2017 (LWP) |
| 11 | Smt. Priti U. Rawool | 02.11.2016 to 30.04.2016 | 01.04.2016 to 12.05.2016 (EL) |
| 12 | Smt. Pranita B. Gorle | 29.12.2017 to 26.06.2018 | 27.06.2018 to 24.08.2018 (HPL) |
| 13 | Smt. Prajakta A.Vartak | 17.08.2016 to 12.02.2017 | - |
| 14 | Smt Narmada D. Raut | 01.02.2017 to 30.7.2017 | 31.07.2017 to 28.09.2017 (HPL) 29.09.2017 to 21.12.2017 (EL) |
| 15 | Smt Bhavana K. Nerkar | 13.02.17 to 11.08.2017 | 12.08.2017 to 13.10.2017 (EL) |

Deputy Registrar
(Establishment II/IV)